**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.९५/२०२६**
**निशाणी क्रमांकः– १२ खाली**
**प्रतिभा चितळे व इ. वि. कोणीही नाही.**

**अर्जदार तर्फे साक्षीदार क्रमांक १ यांची शपथेवरील जबानी**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,
माझे नावः– प्रतिभा कृष्णा चितळे

**सरतपास अर्जदार तर्फे वकील श्री. गणेश शेलार यांचे मार्फत सुरू**

**०१.** सदर प्रतिज्ञापत्रातील मजकूर माझे सांगण्याप्रमाणे लिहिलेला आहे व तो बरोबर आहे व तो वाचल्यानंतर मी त्यावर सही केली. माझ्या पतीच्या मृत्यूचा मुळ दाखला मी दाखल केला आहे, त्यास **नि.१३** देण्यात येत आहे. माझी सासु पार्वती देहु चितळे यांचा मृत्यु दाखला उपलब्ध नसल्याबाबत मी प्रतिज्ञापत्र दिले आहे. ते **नि. ११** वर दाखल केले आहे. माझ्या पतीच्या नावावर असलेल्या मालमत्तेच्या नोदणीकृत करारनामा क्र.२८१८/२०१४ ची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे व मुळ प्रत मी सोबत आणली आहे. मुळ वरून झेरॉक्स पडताळून पाहिली ती बरोबर आहे. झेरॉक्सला **नि.१४** देण्यात येत आहे. सदर मालमत्तेचा ताबा दिल्याबाबत माझ्या पतीच्या नावाने असलेल्या पत्राची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे व मुळ प्रत मी सोबत आणली आहे. मुळ वरून झेरॉक्स पडताळून पाहिली ती बरोबर आहे. झेरॉक्सला **नि.१५** देण्यात येत आहे. माझ्या नावाने असलेल्या रेशकनकार्डची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे व मुळ प्रत मी सोबत आणली आहे. मुळ वरून झेरॉक्स पडताळून पाहिली ती बरोबर आहे. झेरॉक्सला **नि.१६** देण्यात येत आहे.

**०२.** दैनिक रायगड नगरी या पेपरमध्ये दि.०४/०२/२०२६ रोजी जाहिर नोटीस प्रकाशित केली होती तो पेपर मी दाखल केलेला आहे. त्यास **आर्टिकल अ** देण्यात येत आहे.

**सरतपास पूर्ण.**
**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

RAJESH YASHWANTRAO KHANDARE
Digitally signed by RAJESH YASHWANTRAO KHANDARE
Date: 2026.03.25 16:07:15 +0530

**ठिकाणः पनवेल** **(आर. वाय.खंडारे)**
**दिनांकः– २५/०३/२०२६.** **५वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, पनवेल**